| | पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.<br>जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर<br>दुरध्वनी – ०२५२५ - २५११०० <br>E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com | |
|---|---|---|

**प्रेसनोट क्र. ६८ दिनांक १४/११/२०२४**

# अंमली पदार्थाची वाहतुक करणाऱ्या आरोपीवर स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचेकडून कारवाई

आगामी सार्वत्रीक विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून संपुर्ण महाराष्ट्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांना पालघर जिल्हयात चालणारे अवैध धंदे, विनापरवाना अग्नीशस्त्र बाळगणारे इसम यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने दि.१२/११/२०२४ रोजी पोनि/प्रदिप पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचे आदेशान्वये सपोनि/व्हटकर, पोहवा ४८६/संदीप सुर्यवंशी, पोहवा ५३०/दिपक शांताराम राऊत, पोहवा ६२०/ नरेंद्र नाना पाटील, पोलीस नाईक १११०/ कल्याण अंकुश केंगार असे बोईसर शहरात गुन्हे वॉच पेट्रोलिंग करत असताना १९.२० वाजता दरम्यान खैरापाडा कृष्णानगर परीसरात शास्त्री क्लिनिक समोर आले असता रोडचे बाजूस एक सफेद रंगाची फोर्ड कंपनीची इंडेव्हर मोटार कार क्रमांक एम.एच.४६/पी/४१४१ हिचा संशय आल्याने सदरची मोटार कार तपासून पाहिली असता सदर मोटार कारचे मागील सिट खाली प्लॉस्टीक पिशवीत कॅनेबीस वनस्पती पासुन तयार केलेला उग्र दर्प असलेला काळपट गडद रंगाचा गांजा हा अंमली पदार्थ मिळून आल्याने आरोपी सॅड्रीक लेसर डेव्हीड लोनाप्पा वय ४२ वर्षे रा.कडेश्वरी देवी मंदीर मार्ग सेंट फ्रॉन्सीस ऑफ अस्सीसी चर्च जवळ चांदीवाला कंपाऊंड चाळ, बांद्रा पश्चिम मुंबई यास ताब्यात घेवून खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

१) १६०००/- रुपये किंमतीचा १ किलो ६६५ ग्रॅम वजनाचा कॅनबीस वनस्पतीचा पासून तयार केलेला उग्र दर्प असलेला काळपट गडद रंगाचा गांजा हा अंमली पदार्थ.

२) १५००/- रुपये रोख रक्कम त्यामध्ये ५०० रुपये दराच्या तीन नोटा

३) ४,००,०००/- रुपये किंमतीची एक सफेद रंगाची फोर्ड इनडोव्हर मोटार कार क्रमांक एम.एच.४६,पी.४१४१

असा एकुण ४,१७,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर आरोपीकडे अधिक सखोल चौकशी केली असता त्याचेविरुध्द याअगोदर खालीलप्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. | कलम |
|---|---|---|---|
| १ | वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई. | I ७८२/२०२४ | एन.डी.पी.एस.कायदा कलम ८ (क), २० (ब) प्रमाणे. |
| २ | वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई. | I ३९६/२०१८ | भादविसं कलम ३५४, ५०४, ५०६, ५०९, ३२३, ३४ प्रमाणे. |
| ३ | खार पोलीस ठाणे, मुंबई. | I ५९६/२०२३ | एन.डी.पी.एस.कायदा कलम ८ (क), २० (ब) प्रमाणे. |

सदर आरोपीविरुध्द बोईसर पोलीस ठाणे येथे II ५१९/२०२४ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८ (क), २० (ब) (ii) अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक करण्यात आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास हा पोउपनि/विठ्ठल मणिकेरी, नेम. बोईसर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा. श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, मा. श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक पालघर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/प्रदिप पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, सपोनि/व्हटकर, पोहवा ४८६/संदीप सुर्यवंशी, पोहवा ५३०/दिपक शांताराम राऊत, पोहवा ६२०/ नरेंद्र नाना पाटील, पोलीस नाईक १११०/ कल्याण अंकुश केंगार सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांनी पार पाडलेली आहे.